# गडचिरोली प्रकल्पातील शासकीय आश्रमशाळा रेगडी येथे शिकणा–या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना मिळणा–या थेट लाभ हस्तांतरण योजनेचा (DBT Scheme) अभ्यास

**सुनिता ज्ञानोबा कराड***
अर्थशास्त्र विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

**प्रा. डॉ. डी. जे. महाजन****
अर्थशास्त्र विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

***गोषवारा (Synopsis):–***
*गडचिरोली प्रकल्पातील रेगडी येथील भासकीय आश्रम शाळांमधील अनुसूचित जमातीच्या (ST- category) विद्यार्थ्यांना मिळणा–या थेट लाभ हस्तांतरण योजनेचा (DBT- Scheme) चा लाभर्थ्यांच्या जिवनावर झालेला शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक परिणाम इ. बाबींचा शोध प्रस्तुत संशोधन पत्रिकेत घेतला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी संशोधन क्षेत्र हे शासकीय आश्रम शाळा, रेगडी हे निवडले आहे. तसेच प्रस्तुत संशोधनाच्या माहिती संकलनासाठी प्राथमिक व दुयम स्त्रोत वापरले आहेत. साधी यादृच्छीक नमुना निवड पध्दती वापरली आहे.*

**प्रस्तावना (Introduction):–**

महाराष्ट्र राज्यात डोंगराळ व दुर्गम भागात राहणाऱ्या अनुसूचित जमाातीच्या लोकांची सामाजिक व शैक्षणिक प्रगती होण्यासाठी १९७२–७३ पासून क्षेत्रविकासाचा दृष्टीकोन स्विकारण्यात आला अशा भागाचा मूलभूत विकास व्हावा आणि त्याचा फायदा सर्वांना व्हावा यासाठी तेथे मूळ केंद्रस्थान म्हणून आश्रमशाळा असावी या शाळेत आदिवासी विद्यार्थ्यांची इ. १० ते १२ वी पर्यंतच्या शिक्षणाची सोय उपलब्ध आहे. महाराष्ट्र राज्यातील नागपूर विभागांतर्गत गडचिरोली हा अतिपूर्वेकडील छत्तीसगड व तेलंगणा राज्य सीमालगत असलेला आदिवासी बहुल जिल्हा आहे. या जिल्हयामध्ये आदिवासी लोक मोठया प्रमाणात वास्तव्य करतात. येथील आदिवासी लोक आपली संस्कृती जोपासून साधेपणाने जिवन जगतात. अनुसूचित जमातीतील विद्यार्थी हे दुर्गम भागात राहतात त्यामुळे त्यांना विविध समस्यांचा सामना करावा लागतो. या भागातील लोकांना चांगले रस्ते, वीज, शिक्षण, इ. मूलभूत सुविधा उपलब्ध नसल्याने त्यांचा विकास होताना दिसत नाही. जेथे भौतिक सुविधांची कमतरता आहे. अशा भागातील लोक शिक्षणपासून वंचित राहू नयेत म्हणून शासनामार्फत भासकीय आश्रम शाळा चालविल्या जातात.

रेगडी हे गाव जिल्हा मुख्यालयापासून सुमारे ७० कि.मी. अंतरावर वसलेले आहे. येथील बहुतांश लोकसंख्या अनुसूचित जमातीची आहे. म्हणूनच महाराष्ट्र शासनाने शासकीय माध्यमिक तथा उच्च माध्यमिक आश्रमशाळा, रेगडी येथे १९८२ पासून सुरू केली. तेव्हापासून आजपर्यंत या शाळेतून अनेक आदिवासी विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले आहे. सदर शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना निवास, भोजन, गणवेश, अंथरूण पांघरूण, पुस्तके तसेच लेखन साहित्य इ. सुविधा शासनाकडून मोफत पुरविण्यात येतात. यातील साहित्य मिळण्यास विलंब होवू नये व ते विद्यार्थ्यांना आवश्यकतेनुसार विकत घेता यावे. सदर साहित्य पालक व विद्यार्थी यांना स्वत: खरेदी केल्यामुळे त्या साहित्याचा दर्जा तपासून घेता येतो. यासाठी शासनाने थेट लाभ हस्तांतरण योजना (DBT Scheme) सुरू केली. या योजनेद्वारे लाभर्थ्यांच्या थेट बॅक खात्यात रक्कम जमा केली जाते. सदर योजनेच्या सद्यस्थितीचा आढावा या संशोधन पत्रिकेतून संशोधकास घ्यावयाचा आहे.

**संशोधन प्रश्न (Research Question):–**

१. गडचिरोली प्रकल्पातील रेगडी आश्रमशाळेमध्ये थेट लाभ हस्तांतरण योजना (डीबीटी) ची प्रभावी अंमलबजावणी होत आहे काय?
२. थेट लाभ हस्तांतरण योजना (डीबीटी) मुळे लाभार्थी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक जीवनात सुधारणा होत आहे काय?

**उद्दिष्टे (Objectives):–**

१. थेट लाभ हस्तांतरण योजना (DBT Scheme) अभ्यासणे.
२. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, गडचिरोलीतील आदिवासी लोकसंख्येचा आढावा घेणे.
३. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, गडचिरोली अंतर्गत येणा–या रेगडी यथील शासकीय आश्रम शाळेचा अभ्यास करणे.
४. थेट लाभ हस्तांतरण योजना (DBT Scheme) चा लाभार्थी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक जीवनावर झालेला परिणाम अभ्यसणे.

**गृहितके (Hypothesis):–**

१. थेट लाभ हस्तांतरण योजना (डीबीटी) मुळे लाभार्थी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक जीवनात सुधारणा होत आहे.
२. थेट लाभ हस्तांतरण योजना (डीबीटी) मुळे लाभार्थी विद्यार्थ्यांच्या राहणीमानात सुधारणा होत आहे.

**महिती संकलन (Data Collection):–**

प्रस्तुत संशोधन पत्रिकेसाठी प्रामुख्याने प्राथमिक स्त्रोत व दुयम स्त्रोत अशा दोन प्रकारच्या माहिती स्त्रोत वापरले आहेत. प्राथमिक स्त्रोत यामध्ये प्रश्नावली व निरीक्षण पध्दती वापरली तरदुयम स्त्रोताद्वारे संबंधित विषयासाठी पूरक असे विविध अहवाल, नियतकालिके, जर्नल्स, इ. प्रकारच्या माहिती स्त्रोतांचा आधार घेतला आहे.

**संशोधन पध्दती (Research Methodology):–**

प्रस्तुत संशोधनासाठी गडचिरोली जिल्हयातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोली हा कार्यक्षेत्राने मोठया प्रकल्पांपैकी असून या प्रकल्पात शासकीय आश्रमशाळांची संख्या जास्त आहे. याप्रकल्पात एकूण ०५ तालुके असून त्यामधील चामोर्शी तालुका निवडला आहे. या तालुक्यात ०३ शासकीय आश्रमशाळा आहेत. रेगडी हे गाव जिल्हयातील आदिवासीबहुल गाव म्हणून ओळखले जाते. येथील शासकीय आश्रमशाळा ही इयत्ता १२ वी पर्यंत वर्ग असणारी मोठी आश्रमशाळा आहे. म्हणून शासकीय आश्रमशाळा, रेगडी हे संशोधन क्षेत्र म्हणून निवडण्यात आले आहे. शै. सत्र २०२१–२२ मध्ये या शाळेतील इयत्ता १२ वीच्या कला व विज्ञान शाखेत एकूण ९७ विद्यार्थी असून त्यापैकी कला शाखेत ४८ व विज्ञान शाखेत २७ विद्यार्थी अनुसूचित जमातीचे आहेत. त्या विद्यार्थ्यांपैकी अनुसूचित जमातीचे २० विद्यार्थी अभ्यासगट म्हणून साध्या यादृच्छिक नमुना निवड पध्दतीने (Random Samplling) निवडले आहेत.

**माहितीचे विश्लेषण**

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय,गडचिरोली अंतर्गत येणा–या तालुक्यातील आदिवासी लोकसंख्येची सांख्यिकी माहिती दर्शविणारा तक्ता.

**२०११ च्या जनगनेनुसार प्रकल्प निहाय आदिवासी लोकसंख्या टक्केवारी**

| अ. क्र. | प्रकल्प व जिल्हा | तालुका | एकूण लोकसंख्या | आदिवासी लोकसंख्या | आदिवासी लोकसंख्या टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | गडचिरोली | गडचिरोली | १४५९६३ | २८४२१ | १९.४७ |
| २ | | वडसा | ८३६०७ | ७१९९ | ८.६१ |
| ३ | | आरमोरी | ९७०९७ | २३१२० | २३.८१ |
| ४ | | कुरखेडा | ८६०७३ | ४६८२६ | ५४.४० |
| ५ | | धानोरा | ८२६९८ | ५८७४५ | ७१.०४ |
| ६ | | चामोर्शी | १७९१२० | ३२६२३ | १८.२१ |
| ७ | | कोरची | ४२८११ | ३१३३३ | ७३.१९ |

*माहिती संकलन अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन.*

वरील माहिती वरून असे दसते की सर्वाधिक लोकसंख्या चामोर्शी तालुक्यात आहे व या तालुक्यात आदिवासींच्या लोकसंख्येची टक्केवारी १८.२१ टक्के आहे. या तालुक्यातील शासकीय आश्रमशाळा, रेगडी येथे शै. सत्र २०२१–२२ मध्ये या इयत्ता १२ वी च्या एकूण ९७ विद्यार्थ्यांपैकी अनुसूचित जमातीच्या कला व विज्ञान शाखेच्या २० विद्यार्थ्यांकडून प्रश्नावलीद्वारे माहिती संकलीत केली आहे. पुढील कोष्टकाच्या आधारे सदर महितीचे विश्लेषण करता येईल.

| प्रश्न | होय | नाही | संगता येत नाही |
|---|---|---|---|
| १. (डीबीटी) मुळे तुमच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक जीवनात सुधारणा होत आहे असे आपणास वाटते काय? | १८ | ०२ | ०० |
| २. (डीबीटी) रक्कम शालेय साहित्य खरेदीकरतापुरेशी आहे काय? | ०४ | १६ | ०० |
| ३. (डीबीटी) रक्कमेतून शालेय साहित्यचीच खरेदीकरता काय? | १८ | ०० | ०२ |
| ४. (डीबीटी) रक्कम वेळेवर मिळते काय? | ०० | २० | ०० |
| ५. (डीबीटी) रक्कम बॅंक तुमच्याच खात्यावर जमा होते काय? | २० | ०० | ०० |

क्षेत्र भेट रेगडी २०२२

वरील माहितीचे विश्लेषण केले असता असे लक्षात येते की,(डीबीटी) मुळे लाभार्थी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक जीवनात सुधारणा होत आहे असे १०० टक्के विद्यार्थी सांगतात. (डीबीटी) रक्कमपुरेशी नसल्याचे ८० टक्के

विद्यार्थी सांगतात. सदर रक्कम शालेय साहित्य खरेदीकरीता वापरतो असे सांगणारे ८० टक्के विद्यार्थी आहेत. तर १०० टक्के विद्यार्थी सांगतात की, (डीबीटी) रक्कम वेळेवर मिळत नाही. परंतु सदर (डीबीटी) रक्कम विद्यार्थ्यांच्याच बॅक खात्यावर जमा होते असे ही १०० टक्के उत्तरदाते सांगतात.

निष्कर्श व सूचना (Conclusion & Suggestions)

वरील माहितीचे विश्लेषण केले असता असे लक्षात येते की,(डीबीटी) मुळे लाभार्थी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक जीवनात सुधारणा होत आहे. शालेय साहित्य खरेदीकरीता ही (डीबीटी) रक्कम वेळेवर मिळण्याची अपेक्षा विद्यार्थी करतात. वरील निष्कर्शावरून पुढील सूचना करता येतील.

१. इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांना मिळणारी एका शैक्षणिक सत्रासाठीची रक्कम पुरेशी नसून वाढवून द्यावी.
२. (डीबीटी) योजनेद्वारे आधुनिक अभ्यासक्रमास उपयुक्त साधने जसे टॅब, स्मार्टफोन, इत्यादी पुरवावे.
३. (डीबीटी) रक्कमवेळेवर अथवा शैक्षणिक सत्राच्या सुरूवातीसच द्यावी.

**सारांशः—**

सदर आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना निवास व भोजन सुविधा शासनाकडून मोफत पुरविण्यात येते. आदिवासी विद्यार्थ्यांना शासनामार्फत विविध प्रकारच्या सोयी सवलती उपलब्ध करून शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्यासाठी गणवेष, अंथरूण पांघरूण, पुस्तके व इतर लेखन साहित्य इ. खरेदी करण्याठी (डीबीटी) रक्कम दिली जाते. (डीबीटी) मुळे लाभार्थी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक जीवनात सुधारणा होत आहे परंतु ती वेळेवर मिळत नसल्याचेही संशोधनांती समजते.

**संदर्भसूचीः—**

*१. वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम (२०१८—१९), आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन.*
*२. अर्थ सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन. पान क्र. १६०*
*३. आदिवासी विकास विभाग वेबसाईट*
*४. आदिवासी विकास विभाग थेट लाभ हस्तांतरण योजना (DBT) अहवाल*
*५. Study of Attitude Towards Tribal Development Programme and Scheme (1990) TRTI Govt. Of Maharashtra, Pune*